# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/05/2023 (शनिवार) सकाळ


## नागपूर ग्रामीण येथील पोलीस स्टेशन उमरेड शासकीय निवासस्थाने इमारतीचा मा. ना. श्री. देवेंद्र फडणविस उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला

नागपूर जिल्हा ग्रामीण अंतर्गत दिनांक २०/०५/२०२३ रोजी शनिवार दुपारी ०१.३० वा. नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस अधिकारी अंमलदार यांचे नुतन शासकीय निवासस्थाने उद्घाटन सोहळा **मा. ना. श्री. देवेद्र फडणविस उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य** यांचे शुभहस्ते पोलीस स्टेशन उमरेड येथे पार पडला. पोलीस स्टेशन उमरेड येथील नुतन निवासस्थाने मा. देवेन्द्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी त्यांचे व्यस्त कार्यक्रमातुन वेळात वेळ काढुन उदघाटन केले.

या प्रसंगी सदर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणुन मा. खासदार श्री. कृपाल तुमाने, मा. आमदार श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. आमदार श्री. राजु पारवे, मा. आमदार श्री. टेकचंद सावरकर हे असुन विशेष उपस्थिती म्हणुन मा. डॉ. छेरिंग दोरजे, भा.पो.से. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र नागपूर सदर कार्यक्रम यांच्या उपस्थितीत पार पडला. सदर कार्यक्रमाचे आयोजन नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद (भा.पो.से.) व अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांनी केले होते.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर